**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २३ नोव्हेंबर २०२५**

---

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८५१/२०२५ भा.न्या.सहित क ८५,११५(२),३५२,३५१(३),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/०२/२०२२ रोजी लग्नानंतर सुमारे ६ महिन्यानंतर ते नोव्हेंबर २०२४ चे दरम्यान, पुजारी वस्ती, वडापुर, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी १७.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | श्रृती लक्ष्मण पुजारी, वय- २२ वर्षे, रा. १०९३, जुनी पोलीस लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) लक्ष्मण- पती, २) सिध्दव्वा- सासु, ३) सुरेश- सासरे, ४) दिपा- नणंद |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीस आम्ही आमच्या मुलीच्या लग्नात २१ तोळे वजनाचे दागिने घातले आहे. तुझ्या आई वडीलांनी आमचे सांगणे प्रमाणे सोन्याचे दागिने दिले नाहीत, लग्नात चांगला मानपान केला नाही, तु आमच्या घरात नांदण्याची व राहण्याची लायकी नाही, तुझे पती व सासरे जसे सांगितले तसे राहावे लागेल, आमचे शेताकरीता ट्रॅक्टर आणुन दया व फॉर्च्युनर कार गाडी दया तरच तुमच्या मुलीला नांदवू नाहीतर दुसरा लग्न करुन घेणार, तु आमचेकडे नांदण्यास येणार असशील तर आईवडीलांकडुन १० लाख रुपये,फॉर्च्युनर कार व ट्रॅक्टर घेवून ये नाहीतर तुला आम्ही नांदविणार नाही. तसेच दि. ०४/११/२०२५ रोजी आरोपीत क्रं. १ ते ४ यांनी फिर्यादीच्या माहेरी घरासमोर येवून आरडा ओरडा करुन शिवीगाळव जिवे मारण्याची दमदाटी करुन मानसिक व शारीरीक त्रास देवून जाचहाट केला आहे म्हणून. तपास:- सफौ- भालशंकर- ९८६०११५६१४ |

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६०६/२०२५ भा.न्या.सहित क ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/११/२०२५ रोजी १८.०० वा ते ०९.०० वा चे दरम्यान, कन्ना चौक, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी १६.०१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चनबसप्पा बसलिंगअप्पा उंबरजे, वय- ६५ वर्षे, रा. ५१७, पुर्व मंगळवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु एक होंडा कंपनीची निळया रंगाची स्कुटर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ बी ए ०७६० ही वरील ठिकाणी पार्क केलेली असताना, कोणीतरी फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने, डयुप्लीकेट चावीचा वापर करुन चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ४४ शेख- **९८६०५२३८४६** |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७८४/२०२५ भा.न्या.सहित क ३०९(६),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/११/२०२५ रोजी १४.४५ वा चे सुमारास, मार्केट यार्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी ००.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | तोफिक म युनुस शेख, वय- ३१ वर्षे, रा. घर नं. १४, वैष्णवी नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अक्षय पवार, २) तुशार राठोड, दोघे रा. मुळेगाव तांडा, व इतर दोन अनोळखी इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील मार्केट यार्ड या ठिकाणी सिध्देश्वर कॅन्टीन समोर फिर्यादी बसलेली प्रवासी रिक्षा पुढे घेण्याच्या कारणावरुन नमुद आरोपीत क्रं. १ व २ यांनी व इतर दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करत हाताने लाथाबुकयाने मारहाण करुन फिर्यादीच्या डोक्यात चाकुने मारुन, फिर्यादीच्या खिशातील ५ हजार रुपये जबरदस्तीने काढुन घेतले आहेत म्हणून. तपास:- सपोनि- जगताप- **९८६७५१३१००** |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७८६/२०२५ भा.न्या.सहित क १८९(२),१९०,१९१(२),११८(१),११५, मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/११/२०२५ रोजी १२.०० वा चे सुमारास, दहिटणे, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी २०.०० वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | : | विलास मारुती रुपनर, वय- ६२ वर्षे, रा. १५२, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रकाश देवकर, २) आबु ऊर्फ नागनाथ चौगुले, ३) शिवराज धोत्रे, ४ तुशार निंबाळकर, ५) राहित निंबाळकर, ६) दिपक चौगुले, ७) दयानंद निंबाळकर, ८) आकाश निंबाळकर, सर्व रा. मड्डी वस्ती, जुना तुळजापूर नाका, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील राहुल भिमाशंकर आळंदकर यांचे दहिटणे येथील खडी क्रशरवर पीसॅण्ड भरणे करीता गाडीची लाईन लावण्याचे कारणावरुन फिर्यादीस मुन्ना अब्दुलकादर सलीम पटेल, चालक हैदर इब्राहिम बेणुरे यांना यातील वरील आरोपीतांनी बेसबॉल बॅट, प्लास्टीक पाईप, लाकडी काठीने व लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ- १३७८- वाघमारे- ९५२७९५१४२८ |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७८७/२०२५ भा.न्या.सहित क २८१,३२४(४), मोवाकाक १८४,१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/११/२०२५ रोजी १७.०० वा चे सुमारास, हैद्राबाद पुणे हायवेवरील रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी २१.०४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आदित्य लक्ष्मण मंजेली, वय- २९ वर्षे, रा. २६७/२०५, वडार गल्ली, रविवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | निळु दादा कांबळे, वय- ५० वर्षे, रा. मु.पो. मोहोळ, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या ताब्यातील वाहन क्रं. एम एच १३ ई एस ८८९७ या वाहनास पाठीमागुन नमुद आरोपीताने टिपर क्रं. एम एच १२ एन एक्स ७७१८ चा चालक याने सदरचा टिपर हयगयीने, अतिवेगाने चालवून, फिर्यादीच्या चारचाकी वाहनास पाठीमागुन जोरात धडक दिल्याने फिर्यादीचे चारचाकी वाहनाचे नुकसान झाले आहे म्हणून. तपास:- सफौ- ओव्हळ- **९२८४६४९१७८** |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७६/२०२५ भा.न्या.सहित क २८१,१२५(अ),१२५(ब), मोवाकाक १८४,१३५(अ)(ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/११/२०२५ रोजी ११.३० वाचे सुमारास, जयभवानी पेठ, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी १७.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शोभाबाई आण्णप्पा भरले, वय- ४८ वर्षे, रा. सोरेगाव, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या हायवे रोडवरील नुर हॉटेल येथील काम संपवुन काम पाहणारे अमन शेख यांचेकडील दुचाकी मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी आर ८७८६ यावर पाठीमागे बसुन सोलापूर हायवे रोड वर सोरेगाव कडे येत असताना, नमुद ठिकाणी इंडिकेटर लावून रोड क्रॉस करुन वळत असताना एक अनोळखी दुचाकी स्वाराने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल निष्काळजीपणाने व हयगयीने चालवून फिर्यादीस धडक देवून फिर्यादीच्या पायास मार लागुन गंभीर दुखापत तसेच डाव्या हातास फॅक्चर होण्यास कारणीभुत झालेला आहे व अपघात स्थळी न थांबता तसाच पळुन गेला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १०४३ गायकवाड- ७०२०४९१५४५ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७८/२०२५ भा.न्या.सहित क ३०३(२),३(५), खनिज ३,४,२१ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/११/२०२५ रोजी ०४.३० वा चे सुमारास, कुमठे गाव, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी २३.२६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संतोष विश्वनाथ कांबळे, वय- ५० वर्षे, रा. घर नं. ९०८, वसंत विहार, जुना पुना नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शिवराज नागनाथ ढब्बे, नेम- मंडल अधिकारी, बाळे, रा. होटगी, ता. द. सोलापूर, २) शशिकांत राजेंद्र जाधव, रा. होटगी, सोलापूर, ३) गणेश सिद्राम कोळी, रा. जुळे सोलापूर, ४) जैद बशीर पिरजादे, रा. होटगी, सोलापूर |
| **मिळाला माल** | : | ३०,१०,०००/- रु त्यात १० ब्रास मुरुम व एम एच १३ सी यु ८१९३ पिवळया रंगाची भारत बेंझ कंपनीची १० चाकी हायवा व एम एच १३ ई पी १५६२ हायवा असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील नमुद आरोपीत मजकुर यांनी नमुद वर्णनाचे व किंमतीचे मुरुम नमुद वाहनांमध्ये वाहतूक करताना मिळुन आला आहे. तसेच सदर वाहनाचे कागदपत्रे सादर केले नाहीत म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३२५ सांगळे- ८८८८९०१९९९ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७७/२०२५ भा.न्या.सहित क ३३१(४),३०५(ए) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/११/२०२५ रोजी २१.०० वा ते दि. २२/११/२०२५ रोजी ०६.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/११/२०२५ रोजी १९.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सतिश शिवप्पा सोलापूरे, वय- ६२ वर्षे, रा. घर नं. ३८, कित्तुर चन्नम्मा नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २,०२,५००/- रुपये त्यात एक २.५९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चैन, २.५९ ग्रॅम वजनाचे कानातील टॉप्स, ३०७ ग्रॅम वजनाचे चांदीचे जेवणाने ताट, वाटी, ग्लास, चमचा, १० ग्रॅम वजनाचे चांदीचे कुंकवाचा करंडा असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी वरच्या मजल्यावर फिर्यादी झोपी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने बाहेरुन कडी लावून तळमजल्यावरील मुख्य दरवाजाचे कडी वाकवुन, लॉक तोडुन घरात प्रवेश करुन, देवघरातील लोखंडी कपाटातील वरील नमुद वर्णनाचा ऐवज व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून चोरुन नेला आहे म्हणून. तपास:- सपोनि- गायकवाड- ९९७०६६३००३ |